# चोरी उघडी पडण्याची भिती? निवडणुक खर्चाचा तपशील न देणाऱ्या उपजिल्हाधिकारी राऊतांवर नामुष्की !!

## विभागीय आयुक्तांकडून उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश

- भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांच्या तक्रारीची गंभीर दखल
- निवडणुकीतील खर्चाच्या तपशील प्रकरणात मोठी आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय
- या प्रकरणात सहभागी अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच न्यायालयात याचिका होणार दाखल

सुनावणीला येण्यास टाळाटाळ; कायद्याचे उल्लंघन केल्याने दिले कारवाईचे आदेश

बीड । दिव्य न्युज

माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत बीडचे तत्कालीन उप जिल्हा निवडणूक अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांना लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या खर्चाचा तपशील देण्यात यावा, अशी माहिती माहिती अधिकारात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांनी मागवली होती. परंतु, त्यांना ही माहिती देण्यास संतोष राऊत यांनी दिरंगाई केली. दरम्यान अशोक कातखडे यांच्या तक्रारीची विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गंभीर दखल घेऊन संतोष राऊत यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. एकंदरीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील चोरी उघडी पडू नये म्हणून की काय निवडणुकीतील पैशांचा तपशील देण्यास दिरंगाई केली असावी, अशी चर्चा आता या निमित्ताने ऐकवास मिळत आहे.



अशोक कातखडे,
अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती, मराठवाडा

### मुदत उलटून गेल्यानंतरही माहिती न दिल्याने केले अपिल

भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांनी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाकडे सन २०१८-१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांतील खर्चाचा तपशील मागवला होता. मात्र, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कायद्यात नमूद असलेली ३० दिवसांची मुदत उलटून गेल्यानंतरही माहिती न दिल्याने त्यांनी प्रथम अपील आणि नंतर द्वितीय अपील दाखल केले.

### या प्रकरणात मोठी आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय

या निर्णयाच्या अनुषंगाने दिलीप गावडे, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १५ मे २०२५ रोजी बीडचे तत्कालीन उपजिल्हा निवडणूक अधिकारी संतोष राऊत यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाईसाठी पत्र जारी केले आहे.

या संपूर्ण प्रकरणात मोठ्या आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय असून, याप्रकरणात सहभागी अधिकाऱ्यांविरुद्ध लवकरच न्यायालयात याचिका दाखल होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली


प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनीही विहीत ४५ दिवसांच्या मुदतीत आदेश न देता सुनावणीला येण्यासाठी टाळाटाळ केली. यानंतर कातखडे यांनी २१ मार्च २०२३ रोजी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद येथील खंडपीठात दाखल केला. त्यानंतर राज्य माहिती आयोगाने २१ नोव्हेंबर २०२३ रोजी या प्रकरणात सुनावणी घेतली. सुनावणीलाअशोक कातखडे स्वतः हजर होते, परंतु संबंधित जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी गैरहजर होते. आयोगाने त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याचे नमूद करत त्यांच्यावर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

# शेतकरी,शेतमालकांनो सावधान..!

## दिंद्रुडमध्ये अनेक शेतकऱ्यांकडून मोठी रक्कम उचल घेऊन सालगडी गायब!

दिंद्रुड । दिव्य न्युजः अखिल सय्यद
शेतात काम करण्यासाठी सालगडी राहतो म्हणून उचल घेऊन फरार झाल्याने दिंद्रुड येथील शेतमालक- शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

अधिक माहिती अशी की. माजलगांव तालुक्यातील दिंद्रुड येथील शेतीनिष्ठ शेतकरी अंकुश विठ्ठलराव ठोंबरे व नवनाथ जिजा ठोंबरे हे मोठे शेतकरी आहेत. त्यामुळे शेतीच्या कामासाठी त्यांना शेतमजूर, सालगड्याची गरज लागते.यामुळे त्यांनी विश्वासाने सालगडी म्हणून राहणाऱ्या व्यक्तीला त्याच्या घरगुती आर्थिक अडचणीसाठी ऍडव्हान्स उचल रक्कम दिली. सदरील व्यक्तीने मात्र याचा गैरफायदा घेत फरार झाले आहेत. या दोन शेतकऱ्यासह आणखी काही शेतकऱ्यांना अशा भामट्या व्यक्तीने सालगडी राहतो म्हणून त्यांच्याकडून मोठी रक्कम उचल (डव्हान्स) घेऊन पोबारा केल्याची घटना काही दिवसापूर्वी घडली आहे. उचल घेऊन गायब होणारे व्यक्ती मध्यप्रदेश व परभणी येथील आहेत. राजू रामचरण धुर्वे, रा.सिताबेडी, खांडवा (मध्य प्रदेश) याने अंकुश ठोंबरे यांच्याकडून एक लाख रुपये उचल घेऊन गायब झाला आहे. त्यांचा फोन व संपर्क होत नाही. तर परभणी येथील अनिल लक्ष्मण जोंधळे,धार रोड म.गां.नगर या व्यक्तीने नवनाथ जिजा ठोंबरे यांच्याकडून ८० हजार रुपये उचल म्हणून घेऊन तो फरार झाला आहे. त्यांचे आधार कार्ड प्रत आहे.त्यांना कसे-कसे पैसे दिले याचेही पुरावे या शेतकऱ्याकडे आहेत! गावाकडे लेकरू आजारी आहे असे सांगून तर कधी काही संसारिक अडचणी सांगून डव्हान्स पैसे घेऊन हे व्यक्ती गायब झाले आहेत. त्यामुळे एक तर पैसे गेले व पेरणीच्या ऐन कामाच्या दिवसात हे गडी गायब झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात व तणावात आहेत. शेतीची कामे तशीच रेंगाळली आहेत. या व्यक्तींनी आमचा विश्वासघात करून फसवणूक केली असल्याचे मत मीडिया प्रतिनिधीशी बोलताना व प्रसिद्धीसाठी दिलेल्या निवेदनात ठोंबरे बंधू यांनी व्यक्त केले आहे. दिंद्रुडमध्ये या शेतकऱ्यांबरोबरच आणखी काही शेतकऱ्यांना अशा ठग्यांनी ठकवल्याची चर्चा होत आहे आहे. हे असे लोक अनेक शेतकऱ्यांना फसवत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत आम्ही फसलेलो, तणावात असून बाकी शेतकरी, शेतमालकानी या लोकांपासून सावध रहावे असे आवाहन ठोंबरे बंधूंनी प्रतिनिधीशी बोलताना केले आहे.





डॉ.सय्यदहुमायुद्दीन या मुलाच्या जशने शादी सोहळ्यातवरपिता असूनही आपल्या नेहमीच्या शैलीत सूत्रसंचालन करण्यात मग्न असलेले कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# संग्राह्य असे बीड कॉफी टेबल बुक-अजित पवार

## नियोजन समितीच्या बैठकीत झाले विमोचन



बीड । दिव्य न्युज
बीड जिल्ह्याची सचित्र आणि उत्तम अशी मांडणी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे पुस्तक कुणालाही आपल्या संग्रही ठेवावे असे वाटेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी केले

बीड जिल्हा माहिती कार्यालयातर्फे नियोजन निधीतून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीत हा विमोचन सोहळा पार पडला. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

**मुंबई :- मा.छगन भुजबळ यांनी मंगळवारी राजभवनात मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**



## केंद्राची योजना : जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करा, उपचार होतील तत्परतेने

# अपघातातील जखमींवर दीड लाखापर्यंत कॅशलेस उपचार



बीड । दिव्य न्युज

**अपघातातील जखमींना वेळीच उपचार मिळावेत आणि प्राण वाचावेत. यासाठी केंद्र सरकारने कॅशलेस उपचार योजना आणली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग आणि परिवहन मंत्रालयाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. कोणत्याही रस्त्यावर अथवा महामार्गावरील अपघातातील जखमींना कोणत्याही रुग्णालयात कॅशलेस उपचार मिळणार आहेत. ही योजना ५ मे २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेमुळे अपघातातील जखमींवर तातडीने उपचार करणे सुलभहोणार आहे.**

**या रुग्णालयांत उपचार!**

अपघातातील जखमींना एक लाखांपर्यंत कॅशलेस उपचार करण्यासंदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. जिल्ह्यातील जिल्हा, उपजिल्हा रुग्णालय तसेच काही खासगी रुग्णालयात अपघातातील जखमींवर दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार होतील.

**काय आहे योजना ?**

कॅशलेस उपचार योजनेनुसार अपघातानंतर जखमींना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागेल. केंद्र सरकार या सरकारी हॉस्पिटलची यादी जारी करील. पोलिसांनाही कळवावे लागेल. जखमींची फाइल तयार होईल. त्यात पोलिस रिपोर्ट तयार होईल. मान्यताप्राप्त कोणत्याही रुग्णालयात जखमींना दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार मिळणार आहेत.



### पोलिसांना २४ तासांत कळविणे बंधनकारक

1. कॅशलेस उपचार योजनेचा लाभ घेण्याचे तीन टप्पे आहेत.
2. पहिला टप्पा अपघातानंतर जखमींना तत्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागेल.
3. दुसरा म्हणजे अपघातानंतर २४ तासांत पोलिसांना कळवावे लागेल. अपघाताची संपूर्ण माहिती, जखमींची प्रकृती याची माहिती पोलिसांना द्यावी लागणार आहे.
4. तिसऱ्या टप्प्यात जखमींची फाईल तयार होईल. त्यात पोलिस रिपोर्ट, जखमीचे ओळखपत्र जमा करावे लागणार आहे.



### काय होणार मोफत उपचार

अपघाताच्या दिवसापासून पुढील ७ दिवसांसाठी १.५ लाख रुपयांचे मोफत उपचार दिले जातील. जखमींना प्रवेशावेळी कुठलेही शुल्क द्यावे लागणार नाही. प्राथमिक उपचार मोफत मिळतील.

गंभीररीत्या जखमी झाल्यास सर्जरी करण्याची सुविधा मिळेल. त्याचबरोबर एक्स-रे, सीटी स्कॅन, एमआरआय यासारख्या सुविधा मोफत मिळतील. उपचारावेळी दिली जाणारी औषधी यांचा समावेश असणार आहे.

**“महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अपघातग्रस्तांना उपचारासाठी लाभ घेता येतो. कॅशलेस संदर्भात निर्णय प्रक्रियेत आहे. काही अडचण असल्यास आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधावा.**

# दिव्य वार्ता

बुधवार २१ मे २०२५




## मयताची ओळख पटवण्याचे गेवराई पोलिसांची आवाहन



चकलांबा । दिव्य न्युज

गेवराई शहराजवळ असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५२ वर बाप पिंपळगाव फाट्याजवळ पाई जाणाऱ्या पादचाऱ्याला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने सदरील इसमाचा जागीच मृत्यू झाला. सदरील घटना राष्ट्रीय महामार्ग पोलीस यांना समजले असता त्यांनी राष्ट्रीय महामार्ग च्या रुग्णवाहिकेमध्ये गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये त्याला आणले असता येथील उपस्थित डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले.

सदरील इसमाचे वय अंदाजे ४० असून या इसमाची ओळख अद्याप पटली नसून या इसमाचा मृतदेह गेवराई उपजिल्हा रुग्णालयामध्ये ओळख पटवण्यासाठी ठेवलेला आहे.सदरील इसमास कोणी ओळखत असल्यास खालील क्रमांका वर माहिती द्यावी ९०११०१३५०५ असे आवाहन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रामनाथ उगलमुगले यांच्या सह पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# काँग्रेसच्या वतीने बीड मध्ये तिरंगा रॅली संपन्न!

## मोटार सायकल रॅली काढून सैनिकांच्या प्रति काँग्रेसने दाखवली सद्भावना









बीड । दिव्य न्युज

पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच काँग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची सुरुवात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय समोरून जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, अड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

### स्व.राजीव गांधी यांना अभिवादन...!

आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अकरावी प्रवेशाला सुरुवात:पहिल्याच दिवशी संकेतस्थळ ठप्प,विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठा गोंधळ



मुंबई । दिव्य न्युज

अकरावीच्या प्रवेशासाठी प्रत्यक्ष अर्ज भरण्याची प्रक्रिया बुधवारी सकाळपासून सुरू झाली, मात्र प्रवेशासाठीचे अधिकृत संकेतस्थळ ठप्प झाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला. या संदर्भात शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता, संकेतस्थळाचे तांत्रिक काम सुरू असून लवकरच ते सुरळीत सुरू होईल, अशी माहिती देण्यात आली.

यंदा दहावीच्या परीक्षेत राज्यभरातून १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या अकरावी प्रवेशासाठी राज्यात एकूण २०,९१,३९० जागा उपलब्ध आहेत. प्रवेशप्रक्रियेची सुरुवात २१ मे रोजी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यावर्षी प्रथमच संपूर्ण राज्यात अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. यापूर्वी ही प्रक्रिया फक्त मुंबई, पुणे-पिंपरी चिंचवड, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका क्षेत्रांपुरती मर्यादित होती. यंदापासून संपूर्ण राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, ही प्रक्रिया सुरळीत पार पडेल की नाही, याबाबत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून आधीपासूनच शंका व्यक्त करण्यात येत होत्या. त्या शंका प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी खरी ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. बुधवारी सकाळपासून अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ उघडण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यावेळी संकेतस्थळ ठप्प असल्याचे निर्दशनास आले. सुरुवातीला संकेतस्थळावर '५०२ इरव त्र्रीशुर' असा संदेश दिसत होता, तर नंतर दुपारी 'संकेतस्थळाचे काम सुरू आहे' असा संदेश झळकू लागला. त्यामुळे सकाळपासून सायबर कॅफे किंवा घरातील

►► पान २ वर

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी घेतली अजितदादांची भेट

### शैक्षणिक कर्जासाठी लागणारे जामीनदाराची अट रद्द करण्याची विनंती
### गेल्या सहा महिन्यांच्या कामाचा अहवाल केला सादर



बीड । दिव्य न्युज

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि मागासपण दूर करण्याच्या हेतुने काम करत आहे. परंतु गरजू विद्यार्थ्यांसाठी जी शैक्षणिक कर्ज योजना राबवली जाते त्या योजनेची नियमावली गोरगरीब विद्यार्थ्यांना थेट कर्ज मिळवून देण्यात अडचणीची ठरू पाहात आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजाकडे स्थावर मालमत्ता अथवा जंगम मालमत्ता उपलब्ध नसते. परंतु विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज जेव्हा घ्यायचे असते तेव्हा त्यांच्याकडे जामीन देण्यासाठी कुठलीच मालमत्ता नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी या योजनेला लागणारे मालमत्ताधारक व नोकरदार जामीनदार ही अट रद्द करावी, अशा आशयाची मागणी एका निवेदनाद्वारे मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक तथा सायं. दैनिक बीड रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांच्या आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड जिल्हा दौर्यावर आहेत. परळी येथे कार्यक्रमाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजितदादा हे आले असता मौलाना आझाद आर्थिक विकास महमंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी त्यांची भेट घेऊन अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या अडीअडचणींवर चर्चा केली. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांचा आपल्या कामाचा अहवालही उपमुखयमंत्र्यांना सादर केला. संचालकपदी नियुक्ती झाल्यानंतर शेख तय्यब यांनी राज्यभर दौरा केला होता.

►► पान २ वर

## गेले ते दिन गेले; थोरात जुन्या आठवणींमध्ये रमले !



नांदेड । दिव्य न्युज

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात मंगळवारी एका विवाह सोहळ्यासाठी नांदेडमध्ये आले होते. हा सोहळा आटोपल्यानंतर येथून मोटारीने देगलूरमार्गे हैदराबादला जात असताना, हळव्या मनाचा हा नेता अडीच वर्षांपूर्वीच्या भारत जोडो यात्रेतील संस्मरणीय आठवणींमध्ये रमला होता.

काँग्रेसचे माजी आमदार माधवराव जवळगावकर यांची कन्या नेहा आणि भाजपा नेते खासदार अशोक चव्हाण समर्थक मारोतराव कवळे यांचे पुत्र संदीप यांचा शुभविवाह मंगळवारी सायंकाळी दिग्गजांच्या मांदियाळीत संपन्न झाला, पण थोरात दुपारच्या सत्रातील कौटुंबिक पातळीवरील सोहळ्यास हजर राहिले आणि वधु-वरांस शुभेच्छा देऊन बाराच्या सुमारास हैदराबादकडे रवाना झाले. नांदेड-देगलूर-संगारेड्डी ते हैदराबाद हा त्यांच्या परतीच्या प्रवासाचा मार्ग होता. अडीच वर्षांपूर्वी खा.राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा तेलंगणातून प्रथम देगलूरला आणि तेथून नांदेड शहरामध्ये दाखल झाली तेव्हा काँग्रेस पक्षातील वातावरण अतिशय हर्षोत्फुल्ल होते. स्वतः बाळासाहेब यात्रेच्या पूर्वतयारीनिमित्त दोनदा नांदेडला आले होते. वरील यात्रा महाराष्ट्रात येण्याच्या काही महिने आधी महाविकास आघाडी सरकार पडल्यामुळे काँग्रेस पक्ष सत्तेबाहेर होता, तरी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी यात्रेचे स्वागत, तसेच राहुल गांधी व भारतयात्रींचा ठिकठिकाणचा मुक्काम, त्यांची भोजनव्यवस्था तसेच यात्रेदरम्यानचे कार्यक्रम-मान्यवरांच्या भेटीगाठी या सर्व बाबींच्या नियोजनात उत्कृष्टता राखली होती. यात्रेच्या नांदेड जिल्हा आगमनापासून ती हिंगोली जिल्ह्यात जाईपर्यंत बाळासाहेब थोरात त्यांत सहभागी होते. पहिल्या दिवशी देगलूरजवळच्या गुरुद्वारातील दर्शन, नंतर गोदावरी मनार कारखाना परिसरातील मुक्काम, पदयात्रेदरम्यानचे छोटे-मोठे प्रसंग या आणि इतर अनेक आठवणींना त्यांनी वरील प्रवासादरम्यान उजाळा दिल्याचे त्यांच्यासोबत गेलेले पक्षाचे येथील कार्यकर्ते विठ्ठल पावडे यांनी सांगितले.


►► पान २ वर

# ढाबा, हॉटेलात दारू प्याल तर कोर्टाची पायरी चढाल

बीड । दिव्य न्युज

जिल्ह्यात बीअर बार परमिट रुमची संख्या कमालीची असली तरी हॉटेल, ढाब्यांचे पेव फुटले आहे. अनेक मद्य शौकिनांना जेवणासोबत हॉटेल, ढाब्यांवर दारू सहज उपलब्ध होते. ही दारू अवैधरीत्या विक्री केली जात असल्याचे माहीत असतानाही अनेकजण झिंगाट होतात. परिणामी शासनाच्या महसुलावर परिणाम होतो. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाईची मोहीम सुरू केली.

बीड जिल्ह्यात १ एप्रिलपासून महिनाभरात मोहीम राबवून अवैध दारू विक्री करणाऱ्या हॉटेल, ढाब्यांवर तसेच तेथे दारू पिणाऱ्यांवर कारवाया केल्या आहेत. 'ढाबा, हॉटेलात दारू प्याल तर कोर्टाची पायरी चढाल', असा इशाराच या कारवाईतून देण्यात आला आहे.



> ढाबाचालकांनी विधिग्राह्य लायसन्स घेऊन मद्यविक्री करावी. तसेच ग्राहकांनी देखील अधिकृत परवाना कक्षातच मद्यसेवन करावे. नसता तो गुन्हा ठरेल. विधिग्राह्य परवान्यांसंदर्भात ढाबाचालकांची बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.
>
> विश्वजीत देशमुख,
> अधीक्षक, उत्पादन शुल्क विभाग, बीड

### ढाबा मालकांवरही कारवाई

विना परवाना दारू विक्री करणाऱ्या हॉटेल, ढाब्यांवर कारवाईसाठी उत्पादन शुल्क विभागाने मोहीम राबविली. १ एप्रिलपासून सुरू केलेल्या मोहिमेत राज्य उत्पादन शुल्कच्या बीड विभागाने १६१ ढाब्यांवर कारवाई केली तर २४६ मद्यपींना अटक करण्यात आली. या कारवाईत मुद्देमालही जप्त केला.

### दारूच्या किमतीपेक्षा दंड जास्त

विनापरवाना दारू विक्री करणाऱ्या हॉटेल, ढाब्यांवर कारवाई केली जाते. तेथे दारू पिणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई केली जाते. दारूच्या किमतीपेक्षा दंडाची रक्कम जास्त असते.

### मद्य सेवनाचा परवाना असला तरी कारवाई

महा सेवनाचा परवाना काढला म्हणजे कुठेही मद्य सेवन करता येते, असा समज करणे चुकीचे आहे. अनेक मद्यशौकीन हॉटेल, ढाबे किंवा परवाना नसलेल्या सार्वजनिक ठिकाणी पार्टी करतात. तेथे त्यांच्यावर कारवाई होऊ शकते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०